लातूर जिल्हयातील लिंगायत समाजाचा इतिहास :एक अभ्यास

प्रास्ताविक

प्राचीन काळापासून महाराष्ट्रात हिंदू, जैन, बौध्द, पारशी, मुस्लिम व लिंगायत समाजाचे लोक **गुण्यागोविंदाने** नांदत आहेत. यामुळे विविधतेतून एकता व एकतेतून विविधता हे महाराष्ट्रीय समाजाचे एक प्रमुख वैशिष्ट्य बनले आहे. लिंगायत हा भारतातील एक स्वतंत्र संप्रदाय असून, या संप्रदायाच्या उदया संदर्भात फार मोठ्या प्रमाणात मतभेद असले तरीही, या संप्रदायाचा उदय आजच्या कर्नाटक राज्यात झाला हे जवळपास सर्वमान्य आहे. कर्नाटकात उदयास आलेल्या लिंगायत संप्रदायाचा प्रसार मात्र कमी-अधिक प्रमाणात संपूर्ण भारतात झालेला आहे. विशेषतः दक्षिण भारत, महाराष्ट्र, कर्नाटक व तेलंगणा या राज्यात लिंगायत समाजाची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.

महाराष्ट्रात लिंगायत समाज मोठ्या प्रमाणात वास्तव्य करून आहे. कर्नाटक राज्याच्या सीमेला **लागून** असलेले जिल्हे विशेषतः पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सोलापूर, सातारा, सांगली याशिवाय मराठवाड्यातील नांदेड व प्रामुख्याने लातूर इत्यादी जिल्ह्यात लिंगायत समाज फार मोठ्या प्रमाणात आढळतो. कुठल्याही देशाच्या, राज्याच्या व जिल्ह्याच्या विकासामध्ये त्या त्या ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या विविध समाज बांधवाचे, सामाजिक संस्थेचे योगदान महत्वपूर्ण असते; पण त्यातील काही समाज घटकांची दखल घेणे गरजेचे आहे.

कर्नाटकात लिंगायत समाजाने कर्नाटकाच्या ऐतिहासिक वाटचालीत दिलेल्या योगदानावर फार मोठ्या प्रमाणात संशोधनपर लिखान झाले. मात्र महाराष्ट्रात लिंगायताची संख्या मोठी असून त्यांनी महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय व आर्थिक विकासात मोठ्या प्रमाणात योगदान दिलेले आहे. पण त्या संदर्भात पुरेसे संशोधन झाले **नाही**.

मराठवाड्यात विशेषतः लातूर जिल्ह्यात लिंगायत समाजाची संख्या फार मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे मराठवाड्यात लिंगायतांचे ‘माहेरघर’ म्हणून लातूर जिल्ह्याचा उल्लेख केला जातो. मराठवाड्यातील औरंगाबाद नंतरचा सर्वात मोठा जिल्हा म्हणून लातूरची एक वेगळी ओळख आहे. प्रसिध्द व्यापारपेठ, सांस्कृतिक व राजकीय घडामोडीचे केंद्र म्हणून प्रसिध्द आहे. याशिवाय मराठवाड्यातील शैक्षणिक पंढरी, शिक्षणाचे **प्रमुख केंद्र** म्हणून लातूर जिल्हा राज्यपातळीवर नव्हे तर देशपातळीवर प्रसिध्द आहे. येथे लिंगायत, मुस्लिम, हिंदु, बौध्द, जैन इ. समाजबांधव एकदिलाने राहतात. प्राचीन काळापासून या जिल्ह्याने इतिहासावर आपल्या कृतृत्वाची

छाप पाडलेली आहे. येथे लिंगायत समाजाच्या अनुयायांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या जिल्ह्याच्या विकासात इतर समाजाच्या लोकांबरोबर लिंगायत लोकांचा सहभाग होता का ? होता तर कोणत्या, कोणता समाज व ज्शा स्वरूपाचा होता. या समाजाचा इतर समाजाकडे व इतर समाजाचा या समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोण ज्सा होता. अशा सर्व प्रश्नांची उकल करण्यासाठी प्रस्तुत संशोधन करण्याच्या अनुषंगाने हा विषय निवडण्यात आला आहे.

लातूर जिल्हयातील लिंगायत समाजाचा इतिहास : एक अभ्यास या शिर्षकाखाली संबंधीत विषयाचे संशोधनात्मक अध्ययन करतांना एक सभ्य, सुसंस्कृतपणा व विकासाची दुरदृष्टी असलेला लातूर जिल्ह्याचा नामोउल्लेख कोणालाही टाळता येण्यासारखा नाही. एव्हाना महाराष्ट्राच्या जडणघडणीसह भारताच्या राजकीय क्षितिजावरही लातूर जिल्ह्याने आपले नांव कोरलेले आहे. राजकारण, समाजकारण, **शिक्षण**, **प्रशासन**, सहकार, इतिहास, कृषी विकास, अर्थकारण, अध्यात्म आदी महत्वाच्या क्षेत्रामध्ये लातूर जिल्ह्याचे योगदान उल्लेखनिय आहे. किंबहूना एक प्रमुख राजकीय सत्ता केंद्र, म्हणूनही लातूर जिल्ह्याचे नाव महाराष्ट्राच्या **राजकारणात** सतत आघाडीवर राहिलेले आहे. थोडक्यात आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात लातुरचे एक आगळे वेगळे वैशिष्ट्य आहे, हे जसे मान्य करावे लागते तसेच लातूर जिल्ह्याच्या विकासात लिंगायत समाजाचेही मोठे योगदान राहिलेले आहे.

आधुनिक काळाच्या इतिहासातील लातूरचे स्थान जसे नाविन्यपूर्ण व अनेक वैशिष्ट्यांनी परिपूर्ण आहे; तसेच महाराष्ट्राच्या व पर्यायाने भारताच्या इतिहासात लातूरला एक वैभवशाली सांस्कृतीक परंपरा आणि हजारो वर्षाचा ऐतिहासिक वारसाही लाभलेला आहे. किंबहूना लातूरच्या इतिहासाच्या वाटचालीचा जेंव्हा जेंव्हा विचार होतो, तेंव्हा राष्ट्रकूट, चालुक्य, यादव, निझामशाही अशा विविध राजकीय सत्तेच्या दृष्टिने लातूरचे एक वेगळे महत्व, त्याचा इतिहास अधोरेखित होतो; शेवटी रझाकारी, जुलमी सत्ता असलेले **निझामाचे** हैद्राबाद राज्य (स्टेट) १७ स्पटें. १९४८ रोजी समाप्त होऊन तत्कालीन लातुरच्या समावेशासह असलेल्या मराठवाड्यातील उस्मानाबाद या जिल्ह्याचा समावेश स्वतंत्र भारतात म्हणजे मुंबई प्रांतात झाला. थोडक्यात निझामाची जूलमी, अन्यायी, शोषित राज्यव्यवस्था उलथून टाकण्यासाठी लिंगायत समाजाने अत्यंत मोठी जबाबदारी स्वीकारून मराठवाडा मुक्तिसंग्रामातही आपले बहुमोल योगदान दिले आहे. तद्नंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळ उभारली गेली. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू झाल्यानंतर त्यानुषंगाने विविध घटना, घडामोडी घडत गेल्या, विशेषतः राज्यपुनर्रचना आयोगाचा अहवाल, **द्वैभाषिक**

राज्याची कल्पना तद्नंतर त्रिराज्य योजना, केंद्रशासित मुंबई असे अनेक पर्याय तत्कालीन काळात पुढे आले असले तरीही संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा, जनमताचा रेटा वाढला. परिणामी शेवटी १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन जूना उस्मानाबाद जिल्हा महाराष्ट्र राज्याचा घटक बनला. याच दरम्यानच्या व तद्नंतरच्या काळात केवळ लातूर (उस्मानाबादच्या) नव्हे तर एकूणच महाराष्ट्राच्या प्रगतीमध्ये लिंगायत समाजाने आपले महत्वपूर्ण योगदान दिले, तर भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातही अनेक लिंगायतांनी प्राणाची बाजी लावली, त्यात थोर राष्ट्रभक्त मलप्पा धनशेट्टी यांचा अग्रक्रमीत पणे विचार करावा लागेल, शिवाय महाराष्ट्राच्या प्रगतीत सहकार महर्षी, तात्यासाहेब कोरे, थोर देशभक्त रत्नप्पा कुंभार, निळकंठराव कल्याणी, धर्मराज काडादी, विश्वनाथ चाकोते, विनय कोरे, सांगोळे अशी कांही मंडळी महाराष्ट्राच्या जडणघडणीत उल्लेखनिय आहेत.

लातूर जिल्हा आणि या जिल्ह्याच्या **विकासात लिंगायताचे** समग्र क्षेत्रातील योगदान खूप महत्वाचे आहे. परंतु तत्पूर्वी या जिल्ह्याच्या निर्मितीचा इतिहास पाहणेही अनिवार्य वाटते. भारताच्या एकूण २९ घटकराज्या पैकी एक महत्वाचे राज्य म्हणून महाराष्ट्राचा उल्लेख करावा लागतो, विशेषतः महाराष्ट्राच्या एकूण महसूली विभांगापैकी मराठवाडा हा विभागही अत्यंत महत्वाचा आहे. याच मराठवाडा विभागात एकूण आठ जिल्हे असून त्यातील एक जिल्हा म्हणजे लातूर होय या जिल्ह्याची निर्मिती ही उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन करून झालेली आहे. सबब उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये लातूर असल्या कारणाने नंतर जनतेच्या व प्रशासनाच्या सोयीसाठी उपयुक्त व्हावे म्हणून सन १९८१ साली स्वतंत्र लातूर जिल्हा निर्मितीची घोषणा महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री बॅ.ए.आर. अंतुले यांनी केली होती. तद्नंतर लगेच दि. १६ ऑगस्ट १९८२ रोजी लातुर जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. नवनिर्मित झालेल्या लातूर मध्ये पुर्वीच्या उस्मानाबाद जिल्ह्यातील लातूर, अहमदपुर, निलंगा, औसा, **उदगीर** अशा पाच तालुक्यांचा समावेश करण्यात आला. तसेच बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यातील रेणापुर सर्कलमधील रेजापुरसह ४३ गावांचा समावेश करण्यात आला. तदनंतर काही तालुक्यांचीही पुनर्रचना करण्यात आली. ऑगस्ट १९९२ रेणापुर / चाकुर हे दोन तालुके तर २३ जून १९९९ रोजी पुर्वीच्या तालुक्यांची पुनर्रचना करण्यात येऊन देवणी, जळकोट व शिरूर अनंतपाळ हे तीन तालुके आस्तित्वात आणले गेले आहेत. सद्या लातुर जिल्ह्यात लातूर तालुक्याचा समावेशासह एकूण अकरा तालुके आहेत. मुख्यतः लातूर शहराचा विचार **करता** इ.स. १९३५ पासून नगरपालिका आस्तित्वात होती, परंतु शहरांची

वाढती लोकसंख्या, झालेले शहरीकरण इत्यादी बाबी लक्षात घेता. इ.स. २०१७ मध्ये लातुर नगरपालिकेचे महापालिकेत रूपांतर झाले, अशा प्रकारे लातूर जिल्हयाची जडणघडण झाली असून २०११ च्या जणगणनेनुसार लातूर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २४,५४,१९६ आहे. त्यात लिंगायत समाजाची लोकसंख्या सुमारे साडे आठ लाख (८,५०,०००) आहे.

लातूर जिल्ह्याच्या विकासातील आणि प्रगतीच्या जडणघडणीत इतर समुदायाप्रमाणे लिंगायत समाजाचेही मोठे योगदान आहे. लातूरच्या वैचारिक, सांस्कृतिक, राजकीय, अध्यात्मिक आदी क्षेत्रांमध्येही लिंगायत जनसमुदायाचे महत्वाचे स्थान आहे. खरे पाहता संशोधनात्मक दृष्टिकोणातून विचार करता भारत हा अध्यात्मक आणि धर्मनिरपेक्षवादी देश आहे. भारत देशाच्या इतिहासात मागे डोकावून पाहिले तर सिंधू संस्कृती पासूनचे विविध संदर्भ प्राप्त झाले आहेत. किंबहूना देशाच्या प्रगतीत महाराष्ट्राचे, मराठवाड्याचे स्थानही महत्वाचे आहे. त्यास लातूर जिल्हाही अपवाद नाही. दुसरे म्हणजे लिंगायत संस्कृती, विचारधारा, इतिहास याबाबीही संशोधनात महत्वाच्या असून लिंगायत समाजाच्या दृष्टिकोणातून विचार करता महात्मा बसवेश्वराच्या काळापासून म्हणजेच १२व्या शतकापासून लिंगायत विचारधारा, चळवळीला कालसापेक्षतः नवे आयाम मिळत गेले. तदनंतर महाराष्ट्राच्याच नव्हेतर एकूण भारताच्या जडणघडणीत आणि विकासात, राजकारणात लिंगायत समाज हा निर्णायक राहिलेला आहे. लातूर जिल्ह्याच्या राजकारणात तर श्री शिवराज पाटील चाकूरकर यांचा राजकीय प्रवास हा नगरपालिकेच्या अध्यक्ष पदापासून ते देशाच्या गृहमंत्री, राज्यपालापर्यन्त झालेला आहे. तसेच जिल्ह्याच्या विकासात माजीमंत्री बसवराज पाटील साहेबांनीही आपले बहूमोल योगदान दिले आहे. एज्ंदरीत लातूर जिल्ह्याच्या विकासात या दोन्ही नेत्यांचे योगदान महत्वाचे मानले जाते. जिल्ह्यांच्या सांस्कृर्तिक, शैक्षणिक विकासात श्री देशीकेंद्र महाराजा पासून लातूरला मोठी परंपरा लाभलेली आहे. जिल्ह्याच्या शैक्षणिक क्रांतीमध्ये महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, श्री महंत स्वामी शिक्षण संस्था, श्री मुक्तेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ औसा, महाराष्ट्र उदयगीरी महाविद्यालय उदगीर, हावगीस्वामी महाविद्यालय उदगीर या सारखी नामांकित महाविद्यालये याबरोबर बिडवे इंजिनिअरींग, चन्नबसवेश्वर औषध निर्माण शास्त्र इत्यादी संस्थेच्या उभारणी मध्ये आणि विकासात्मक वाटचाली मध्ये लिंगायत समाजबांधवाचे योगदान महत्वपुर्ण आहे. देशभरात नावाजलेल्या ‘लातुर पॅटर्न’मध्येही लिंगायताचे योगदान खुप मोठे आहे. राजकारण, शिक्षण क्षेत्रातील योगदानासह सहकार आणि उद्योग क्षेत्रातही लातुर जिल्ह्याच्या विकासात लिंगायतचे योगदान खुप मोठे आहे. विशेषतः

नळेगांव येथील जय जवान जय किसान सहकारी साखर कारखाण्याच्या निर्मितीत लिंगायतांची मोठी भूमिका आहे. याशिवाय साई शुगर कारखाना, हसेगांव, ता. औसा हा कारखानाही लातुर जिल्ह्याच्या विकासात, रोजगारीच्या क्षेत्रात मोठी भूमिका पार पाडलेला आहे. आर्थिक क्षेत्रातही लातूरच्या अर्थकारणाला बळकटी देण्याचे काम लिंगायत समाजाने केले आहे. यात व्यापार - उद्योगांसह श्री सिध्देश्वर सहकारी बँक, साईबाबा सहकारी बँक लातुर यांनी बँकिंग क्षेत्रात मोठा वाटा उचलला असून वैद्यकिय क्षेत्रातही उदगीरचे सुपर मल्टीस्पेशालिस्टी हॉस्पिटल गरजू रूग्नांना सेवा पुरविते यात डॉ.अर्चनाताई पाटील यांचे योगदान आहे. किंबहूना लातूर जिल्ह्याच्या विविध स्थानिक स्वराज्य संस्थाचे नगराध्यक्ष, जि.प.चे अध्यक्ष, महापौर अशा संस्थात्मक पातळीवर काम करून लातूर जिल्ह्याच्या विकासात महत्वाचे योगदान लिंगायताचे आहे. लातूर जिल्ह्याच्या विकासातील लिंगायत समाजाचे योगदान महत्वाचे असून विविध शैक्षणिक संस्था, वकिल, डॉक्टर, **प्राध्यापक**, शिक्षक, इंजिनिअर या क्षेत्रातही लिंगायताचे बहूमोल योगदान आहे. किंबहूना सांस्कृर्तीक क्षेत्रातील लिंगायताचे योगदान वाखाण्याजोगे आहे मराठी, हिन्दी, कन्नड अशा भाषांमधून लिंगायत लेखकांनी अनेक ग्रंथाची निर्मिती केली आहे. एकंदरीत शिक्षण, राजकारण, सहकार, **अर्थकारण**, पत्रकारीता, उद्योग, बँकिंग आदी क्षेत्रात लिंगायताचे खूप मोठे योगदान दिले असून, लातूर जिल्ह्याच्या विकासाला आणि प्रगतीला या समाजाने नेहमीच हातभार लावलेला दिसून येतो. कांही बाबतीत लिंगायत समाजावर मर्यादाही आलेल्या आहेत, जून्या काळी व्यापारावरती, अर्थकारणावरती असलेले वर्चस्व आज कमी होताना दिसून येते आहे. याची नोंद पुढील संशोधनात घेतल्या जाणार आहेत. अशा सर्व मर्यादेचेही संशोधनात अध्ययन करण्यात येणार आहे. सबब संशोधन कार्यासाठी संशोधन कार्याचा आराखडा पुढील प्रमाणे तयार केलेला आहे.

संशोधनाचे कार्यक्षेत्र

महाराष्ट्रातील लिंगायत समाजाचा विस्तार व कार्य मोठ्या प्रमाणात आहे. मात्र त्यांच्या **समग्र कार्याचे** विस्तृत संशोधन व्हावे, म्हणून मी माझ्या संशोधनाचे कार्यक्षेत्र लातूर जिल्हा एवढेच मर्यादीत ठेवले आहे. शिवाय या जिल्ह्यात लिंगायत समाजाची संख्या लक्षणीय असून ती कार्यक्षम आहे.

संशोधनाचे उदिष्टे (Objects) :

संशोधकाने संशोधन कार्यासाठी संबंधीत विषय निवडीच्या अनुषंगाने कांही उद्दिष्ट्ये मांडली आहेत. ती उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे -

१) लिंगायत समाजाचा प्रचार व प्रसार महाराष्ट्रात कसा झाला, यावर प्रकाश टाकणे.

२) लातूर जिल्ह्यात शैक्षणिक संस्था स्थापन करून लिंगायत समाजानी महाराष्ट्र व भारतीय समाजाच्या शैक्षणिक विकासात हातभार लावला, त्यावर प्रकाश **टाकणे.**

३) लातूर जिल्ह्याच्या सामाजिक व राजकिय क्षेत्रातील लिंगायत समाजाने दिलेल्या योगदानाचा शोध घेणे.

४) स्थानिक इतिहास लेखनाद्वारे लातूरचा प्रारंभिक इतिहास रेखाटणे.

५) लातूर जिल्ह्याच्या विकासात लिंगायत समाजाच्या योगदानाचा अभ्यास करणे.

६) लातूर जिल्ह्याच्या सहकार, सांस्कृतिक तसेच अर्थकारणाच्या विकासातील लिंगायतच्या योगदानासोबत परिस्थितीनुरूप झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

७) लातूर जिल्ह्यातील लिंगायताची आर्थिक स्थिती, ऐतिहासिक संदर्भ, रोजगार तसेच या समाजासमोरील उदभवणाऱ्या विविध समस्यांचे अध्ययन करणे.

८) लातूर जिल्ह्याच्या विकासामध्ये भविष्यातही लिंगायत समाजाचे योज्दा-न **अधिक** वाढावे, याकरिता कांही शिफारशी व उपाययोजना सुचविणे.

९) लिंगायत समाजाबाबत असलेले गैरसमज दूर करणे.

परिकल्पना :

संशोधकाने संशोधन कार्यासाठी पुढील परिकल्पना निश्चित **केलेली** आहेत -

१) लिंगायत समाज महाराष्ट्रातील इतर संप्रदायाप्रमाणे एक प्रमूख संप्रदाय असून शेकडो वर्षापासून त्यांचे आस्तित्व महाराष्ट्रात आहे.

२) लातूर जिल्ह्याच्या पर्यायाने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक विकासात लिंगायत समाजाने बहुमूल्य योगदान दिले आहे.

३) लातूर जिल्ह्यात लिंगायत समाजाच्या अनुयायानी समाजाला जागृत करण्यासाठी पत्रकारितीच्या क्षेत्रात ही लक्षणीय योगदान दिले आहे.

४) लातुर जिल्हा व परिसराच्या शैक्षणिक प्रगतीसाठी लिंगायत समाजाने महत्वपुर्ण योगदान दिले आहे. त्यामुळे या जिल्ह्याची शैक्षणिक गुणवत्ता व दर्जा वाढण्यास मदत झाली आहे.

५) महाराष्ट्रातील लिंगायत समाजाचा प्रसार कर्नाटक राज्यापासून झाला असून, त्यांच्यावर कर्नाटकातील रितीरिवाज, चालीरिती, परंपरा व संस्कृतीचा प्रभाव जाणवतो.

६) महाराष्ट्रातील लिंगायत समाज केवळ व्यापारात मग्न न राहता, महाराष्ट्राच्या सर्वांगीन विकासात कमी अधिक प्रमाणात इतर समाजा ऐवढे योगदान दिले आहे.

७) महाराष्ट्रातील लिंगायत व वारकरी संप्रदायाचा परस्परावर प्रभाव पडलेला आहे.

८) मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यातील लिंगायत समाजाची लोकसंख्या मोठयाप्रमाणात असल्यामुळे ती विकासाच्या प्रक्रियेत निर्णायक आहे.

९) लातूर जिल्ह्याच्या विकासात लिंगायत समाजाने पुढाकार घेतला असून अनेक सेवाक्षेत्रांच्या माध्यमातून योजदा-न दिले आहे.

१०) लातूर जिल्ह्याच्या विकासाच्या अनुषंगाने विचार करता शिक्षण, बँकिंग, राजकारण, सहकार क्षेत्रातील लिंगायताचे योगदान महत्वाच्या स्थानी आहे.

११) उद्योग, सामाजिक सेवा, अर्थकारण व सांस्कृतिक जडणघडण, स्थानिक स्वराज्य संस्था इ. मध्ये लिंगायतांचे योगदान राहिलेले आहे.

१२) वडीलोपार्जीत व्यवसायात आलेले मर्यादा, आलीकडे राजकारणात झालेली पिछेहाट इ. कारणामुळे या समाजाला विकासाच्या दृष्टीने अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

संशोधन समस्या (Research Problem) :

लातूर जिल्ह्याच्या विकासात लिंगायत समाजाचे योगदान कोणकोणत्या क्षेत्रातील आहे याचे निश्चित उत्तर शोधण्यासाठी संशोधन कार्य हाती घेतले आहे.

संशोधनाची आवश्यकता :

सामाजिक संशोधन असो कि वैज्ञानिक संशोधन असो संशोधन (Research) ही एक सतत अव्यवहतपणे चालणारी एक प्रक्रिया आहे. मानवी संस्कृतीच्या जडणघडणीत, प्रगतीत सर्व जेत्रामध्ये हजारो वर्षापासून निरनिराळ्या रितीने संशोधन चालु आहे. विशेषतः संशोधनाचा विषय कोणताही असला तरी सत्यनिष्ठा, परिश्रम, चिकाटी, सहनाशिलता या आधारावर संशोधनाची वास्तविक गरज असते. प्रस्तुत संशोधनात लातूर जिल्ह्याच्या विकासातील लिंगायताचे योगदान या शिर्षकाखाली करीत असताना संशोधनाचे कार्य लिंगायत समाजाच्या लातूर जिल्ह्याच्या विकासातील योगदानाचे वस्तूनिष्ठ अध्ययन करण्यासाठी संशोधनाची आवश्यकता आहे. तसेच अनेक दृष्टिने हा विषय संशोधनासाठी उपयुकत आहे.

१) भारतात कर्नाटक राज्यानंतर महाराष्ट्रात लिंगायत समाजाची संख्या सर्वाधिक आहे, मात्र त्यांच्या ऐतिहासिक वाटचालीवर महाराष्ट्रात फारसे संशोधन झाले नाही, जे होणे गरजेचे आहे.

२) लातूर जिल्ह्याचा स्थानिक इतिहास रेखाटने व त्यामध्ये लिंगायत समाजाचे योगदान यावर प्रकाश टाकणे गरजेचे आहे.

३) लातूर जिल्ह्याच्या सांस्कृतिक व आर्थिक विकासात लिंगायत समाजाने बहुमूल्य असे योगदान दिले आहे, त्यावर प्रकाश टाकणे.

संशोधन पध्दती (Research Methodology)

लातूर जिल्हयातील लिंगायत समाजाचा इतिहास :एक अभ्यास या विषयावर शोध प्रबंधाची मांडणी करण्यासाठी सर्व प्रथम तथ्य संकलन करून संशोधन पध्दतीचा वापर करावा लागतो. एव्हाना ही तथ्य संकलन करताना प्राथमिक साधने, ज्यामध्ये मुलाखती, प्रश्नावती इत्यादीचा आधार घेऊन दुय्यम तथ्य संकलनालाही महत्वाचे स्थान दिले आहे. दुय्यम साधनांमध्ये संदर्भग्रंथ, रेकॉर्ड, अहवाल, शासकीय, अशासकिय संस्थाचे प्रकाशीत साहित्य इत्यादीचाही वापर करण्यात येताना काही ऐतिहासिक कागदपत्रेही तपासून घेण्यात येतील. गरजेप्रमाणे ऐतिहासिक, विश्लेषनात्मक, वर्णनात्मक, ग्रंथालयीन इत्यादी अभ्यास पध्दतीचा स्वीकार करण्यात येईल.

संशोधनाची व्याप्ती / मर्यादा

लातूर जिल्हयातील लिंगायत समाजाचा इतिहास :एक अभ्यास या विषयाचा अभ्यास करतांना एकंदरीत लातूर जिल्ह्याच्या विकासातील लिंगायत समाजाचे समग्र क्षेत्रातील योगदान महत्वाच्या स्थानी असल्यामुळे संशोधनाची व्याप्ती वाढू शकते. म्हणून मर्यादेचाही विचार करावा लागेल. किंबहुना लातुर जिल्ह्यातील लिंगायत समाजाचा इतिहास समजून घेऊन त्यांचा अभ्यास करत असतांना त्यांचे सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतीक इत्यादी क्षेत्रातील योगदानाचाही अभ्यास करावा लागेल. तसेच संशोधनातील मर्यादा लक्षात घेताना संशोधनाचा आराखडा एकुण सहा प्रकरणात वर्गवारी करून मर्यादा निश्चित केली आहे.

संशोधन साहित्याचा आढावा :

संशोधन साहित्याचा आढावा म्हणजे साहित्याचे पुर्नरावलोकन होय, संशोधन विषयाशी संबंधीत पुर्वसुरीच्या मताचा आढावा म्हणजे साहित्याचा आढावा असे म्हटले तर चूक ठरणार नाही, म्हणून संबंधीत विषयाच्या अनुषंगाने यावर कांही संशोधन झाले आहे का, याचाही आढावा संशोधनात घेतला जाणार आहे.

संशोधन विषयाचे महत्व :

संशोधनाचे महत्व स्पष्ट करताना, लातूर जिल्ह्याच्या विकासातील लिंगायत समाजाचे योगदान महत्वाचे आहे. त्याचे कारण असे की, लातूर जिल्ह्यातील लिंगायत समाजाच्या लोकसंख्येचे प्रमाणही अधिक आहे. किंबहूना लिंगायत विचारधारा, चळवळीच्या स्वरूपातील वैचारिक बांधणीतही लिंगायताची

भूमिका निर्णायक राहिलेली आहे. विशेषतः लातूर जिल्ह्याच्या विकासातही लिंगायत समाजाचे संस्थात्मक पातळीवरील योगदानही महत्वाचे आहे. या सर्व बाबीमुळे संशोधन कार्याचे **वेगळेपणही** लक्षात येते. लातुरच्या जडणघडणीतही लिंगायत समाज आघाडीवर राहिलेला आहे. शिक्षण, राजकारण, समाजकारण, उद्योग, बँकिंग, सांस्कृतीक आदी क्षेत्रात लिंगायताचे योगदान निश्चित आहे, ज्यामुळे लातुरच्या विकासात भर पडलेली आहे. लिंगायत समाजबांधव आणि लातूर जिल्हा या दोन्ही अनुषंगाने या विषयाचे महत्व अधोरेखीत होते.

संशोधन प्रकरणांची वर्गवारी :

संशोधन कार्याची दिशा निश्चित करण्याकरिता संशोधनातील प्रकरणे महत्वाची असतात, ज्यामुळे प्रकरणाची वर्गवारी, त्यांचा नामनिर्देश, एकूण प्रकरणे यांची माहिती संशोधनकर्त्याला देणे अनिवार्य आहे, ज्यामुळे भविष्यातील संशोधन हे एका निश्चित पध्दतीनुसार मार्गस्थ होत असते, म्हणून अशा सर्व गोष्टीचा विचार करून संशोधन प्रकरणाची वर्गवारी ही एकूण सहा प्रकरणात **केली** आहे.

प्रकरण पहिले : विषय प्रवेश
प्रकरण दुसरे : लातूर जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी
प्रकरण तीसरे : लिंगायत समाजाचा इतिहास
प्रकरण चौथे : लिंगायत समाजाचे सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कामगिरी
प्रकरण पाचवे : लिंगायत समाजाचे शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक ज ार्य
प्रकरण सहावे : उपसंहार

* * * * *

<u>संदर्भ ग्रंथ सूची</u>

१) डॉ.मेनकुदळे अशोक 'समतासुर्य म.बसवण्णो', (एप्रिल २०१३), महाराष्ट्र बसव परिषद, भालकी जि.बिदर.

२) डॉ.जवरेगौडा दे., 'लोकायत लिंगायत', (२००८), महाराष्ट्र बसव परिषद, भालकी जि.बिदर.

३) प्रा.करडी गुद्यी राजशेखर, 'लिंगायत तत्वज्ञान व आचरण', (२०१५), महाराष्ट्र बसव परिषद, भालकी जि.बिदर.

४) डॉ.आगलावे प्रदीप, 'संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे', (१ जाने २०००), विद्या प्रकाशन, नागपुर-४४० ००२.

५) डॉ.रोडे सोमनाथ, 'मराठवाड्याचा इतिहास', विद्या बुक्स प्रकाशन, औरंगाबाद.

६) डॉ.घुघरे सुर्यकांत, 'वीरशैव व इतर धर्म', (१९९८), साध-ना बुक गडहिग्लज, कोल्हापुर.

७) जुबरे राजू ब.(संपा), 'धीमंत सत्यशोधक', (ऑगस्ट २०१६), महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान मालकी, जि.बिदर.

८) प्रा.पाटील भिमराव, '**सहकर महर्षी**', तात्यासाहेब कोरे, (२०१७), महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी, जि.बिदर.

९) डांगे गोविंद (संपा), 'वीरशैव लिंगायत धर्मसार ग्रंथ', (२०१०), सौ.मदाकिनी डांगे, पैठण जि.औरंगाबाद.

१०) चन्नवीर भद्रेश्वर मठ, 'लिंजायत स्वतंत्र धर्मच', (२० मे २०१८), प्रगती प्रकाशन, सोलापुर.

११) कऱ्हाडे बी.ए., 'शास्त्रीय संशोधन पध्दती', पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपुर.

१२) डॉ.माशेलकर रघुनाथ, 'शोध नव्या भारताचा', (फेब्रु. २०१४), सह्याद्री प्रकाशन, सिंहगड रोड, पुणे.

१३) सौताकडर विवक, लातूर जिल्हा, (२०१८), विद्याभारती प्रकाशन, लातुर.

१४) पाटील बाळासाहेब मलगौडा (संपा), बसवपथ, (डिसे. २०१८), बसव समिती, फुले प्रिंटर्स, लातुर.

१५) डॉ.कठारे अनिल, 'मराठवाड्याचा इतिहास', (२०००), कल्पना प्रकाशन, नांदेड.

१६)	लातुर जिल्ह्यातील सर्व लिंगायत बँका, सहकारी साखर कारखाने, उद्योजक, राज्यकर्ते **विशेषांक,** नगरपालिकांचे स्मरणिका इत्यादीची माहिती संकलीत केली आहे.

संशोधक

प्रा. देवशेट्टे एस.एम.
(इतिहास, विभाग प्रमूख)
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड जि.नांदेड

मार्गदर्शक

प्रा.डॉ. दंदे एस.बी.
(इतिहास विभाग प्रमूख)
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर
जि.लातूर